## प्रेसनोट

## बोरीवली पोलीस ठाणे, मुंबई यांची कामगिरी

**बांग्लादेशातून अवैधमार्गाने भारतात येवून बनावट कागदपत्रे तयार करून मध्य पूर्वेतील देशातील व्हिसा प्राप्त करण्याच्या प्रयत्नात असलेल्या ०१ बांग्लादेशी एजंट सह १७ बांग्लादेशी तरूणांना बनावट कागदपत्रांसह अटक केलेबाबत.**

मा. श्री राजीव जैन, अप्पर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, मुंबई, मा. श्री अजय कुमार बंसल पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–११, मुंबई, मा. श्री धरणेंद्र कांबळे, सहायक पोलीस आयुक्त, बोरीवली विभाग, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली बांग्लादेशी इसमांचा शोध व अटकेची मोहिम आयोजित करण्यात आली होती.

दिनांक १९/१०/२०२३ रोजी बोरीवली पोलीस ठाणे, मुंबई येथील अधिकारी/अंमलदार यांना गुप्त बातमी प्राप्त झाली की, आकाश स्विटसमोर, एल.टी. रोड, बोरीवली प, मुंबई येथे काही बांग्लादेशातून भारतात घुसखोरी करून आलेले काही इसम येणार आहे त्यावरून सदर ठिकाणी सापळा रचून १) सुमन मोमीन सरदार वय ३१ वर्ष मुळ गाव–ईश्वरीपूरी, श्याम नगर, तालुका– सतखिरा, जिल्हा खुलना, बांग्लादेश २) ओमर फारूख मोल्ला वय २७ वर्ष, रा.ठी. रामचंद्रपुर, पोस्ट–होलीधानी, जिल्हा झिनेधा, बांग्लादेश ३) सलमान आयुब खान वय ३४ वर्ष, रा.ठी. दुर्गाभाटी, पोस्ट–भामीया, प्ंराकटला, जिल्हा–सतखिरा, बांग्लादेश या बांग्लादेशी इसमांना ताब्यात घेवून त्यांनी कोणत्याही वैध कागदपत्रांशिवाय किंवा भारत सरकारने अथवा भारतीय सिमेवरील नोंदणी अधिका–यांनी नेमुण दिलेल्या मार्गाव्यतिरिक्त घुरखोरीच्या मार्गाने भारतीय सरहददीत प्रवेश करून खोटे नाव व बनावट कागदपत्रांचा वापर करून, आधारकार्ड, पॅनकार्ड, पासपोर्ट तयार केल्याने व स्वत:च्या आर्थिक फायदयाकरिता शासनाची फसवणूक केली म्हणून बोरीवली पोलीस ठाणे गुरक ६३०/२०२३ कलम ४२०,४६५,४६७,४६८,४७०,४७१ भादवि सह नियम ३ सह ६ पारपत्र (भारतात प्रवेश) १९५० सह परिच्छेद ३(१)(अ) परकीय नागरिक आदेश १९४८ सह कलम १४ परकीय नागरीक कायदा १९४६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात येवून उपरोक्त नमुद आरोपींना अटक करण्यात आले आहे.

तपासादरम्यान बांग्लादेशातून तरूणांना अवैध मार्गाने भारतात घेवून येणारा एजंट सलमान आयुब खान वय ३४ वर्ष, व सुमन मोमीन सरदार वय ३१ वर्ष याच्याकडे सखोल तपास केला असता त्यांनी त्यांचे इतर ०४ साथीदार देवल अपार्टमेंन्ट, हनुमान नगर, नालासोपारा येथे व इतर १० साथीदार मन्सुरी नगर, गोपचारपाडा, विरार, पालघर येथे असल्याचे सांगीतल्याने तात्काळ मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ११, मुंबई सो. यांच्या मार्गदर्शनाखाली करून सपोनि साळुंके, पोउनि निंबाळकर, पोउनि पाटील व पोलीस अंमलदार असे पथक तयार करून देवल अपार्टमेंन्ट, हनुमान नगर, नालासोपारा येथून ०४ बांग्लादेशी इसम व मन्सुरी नगर, गोपचारपाडा, विरार, पालघर येथून १० बांग्लादेशी इसम यांना ताब्यात घेवून अटक करण्यात आली आहे. आरोपीकडून बनावट कागदपत्रे हस्तगत करण्यात आले आहे. नमुद सर्व आरोपींना मा. न्यायालयाने दिनांक २५/१०/२०२३ रोजी पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

तसेच सदर गुन्हयाचा तपास मा. श्री राजीव जैन, अप्पर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, मुंबई, मा. श्री अजय कुमार बंसल पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–११, मुंबई, मा. श्री धरणेंद्र कांबळे, सहायक पोलीस आयुक्त, बोरीवली विभाग, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली चालू असून नमुद गुन्हयातील पाहिजे आरोपी व तपासादरम्यान निष्पन्न आरोपींचा शोध घेवून त्यांचा गुन्हयामध्ये सहभाग निष्पन्न करून अटक करित आहोत.

सदर कारवाई पथकामध्ये वपोनि.निनाद सावंत, पोनि प्रदिप काळे (गुन्हे), सपोनि सागर साळुंके, सपोनि संदीप म्हस्के, पोउनि प्रमोद निंबाळकर, पोउनि इंद्रजित पाटील, पो.ह. शेख, पो.ह. बाबर, पो.ह. जाधव, पोह. गोसावी, पोह गायकवाड, पोशि. फर्डे, पोशि. भोये, पोशि बोरसे, पोशि. पवार, पोशि.केसरे, पोशि.गर्जे, पोशि रेवाळे यांचा प्रत्यक्ष सहभाग होता.

Scanned with CamScanner